**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
(शासन निर्णय क्रमांक - आरईएस१०.१००१/प्र.क्र.१ १२२/सेवा१ दिनांक -११/१२/२००१ )

# आरोग्य सहाय्यक (स्त्री) यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

बहुउद्‌देशिय आरोग्य सेवक योजनेअंतर्गत ग्रामीण भागामध्ये एकुण १५,००० लोकसंख्येसाठी आणि आदिवासी भागामध्ये १०,००० लोकसंख्येसाठी किमान ३ उपकेंद्र कार्यरत असून आरोग्य सहाय्यिकेला आरोग्य सेविकांच्या कामाचे पर्यवेक्षण आणि नियंत्रण करावे लागते त्यांच्या जबाबदाऱ्या खालील प्रमाणे आहेत.

## ➢ पर्यवेक्षण व मार्गदर्शन (Supervision &Guidance)

१) आरोग्य सेविकेला आरोग्य सेवा देतांना मार्गदर्शन करणे व त्यांच्या कामाचे पर्यवेक्षण करणे तसेच त्यांचे कौशल्य व ज्ञान वृध्दींगत करणे.
२) आरोग्य सेविकेला कार्यक्रम तयार करण्याकरिता आणि त्यांची अंमलबजावणी करण्याकरीता मदत करणे व मार्गदर्शन करणे.
३) प्रत्येक उपकेंद्राला आठवडयातून एका विशिष्ट दिवशी भेट देऊन आरोग्य सेविकेने केलेल्या दैनंदिन कामाची पाहाणी करणे व काही त्रृटी आढळल्यास त्यांना मार्गदर्शन करुन त्रृटींची दुरुस्ती करणे.
४) आरोग्य सेविकेने केलेल्या कामाची नियमित पडताळणी करुन पडताळणी अहवाल प्रा. आ.केंद्राच्या वैद्यकिय अधिकाऱ्यांस सादर करणे.
५) आरोग्य सेविकेच्या क्षेत्रांत पर्यवेक्षकिय गृहभेटी देणे.
६) राष्ट्रीय प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमांत व राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांत पर्यवेक्षण व मार्गदर्शन करणे.
७) प्रा.आ.केंद्र येथे आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सभेला उपस्थित राहाणे व मार्गदर्शन करणे.
८) आरोग्य सेवक महिला यांनी केलेल्या कामाची कमीत कमी १०टक्के घरांना भेटी देवून पडताळणी करुन पर्यवेक्षण करणे.
९) सर्व गर्भवती स्त्रियांना व्ही.डी.आर.एल. तपासणीकरिता सोयी उपलब्ध असलेल्या हॉस्पिटलला पाठवणे.

## ➢ संघकार्य

१) सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांना संघकार्याचे सदस्य म्हणून कार्य करण्यांस मदत करणे.
२) आरोग्य सहाय्यक (पु) व इतर आरोग्य कर्मचारी,आरोग्य मार्गदर्शक,दाई यांच्या मदतीने कार्य करणे.
३) क्षेत्रातील इतर विभागाच्या आणि संस्थांच्या कार्यक्रमासोबत आपले आरोग्य विषयक कार्यक्रम राबवणे.व गटस्तरावरील सभांना उपस्थित राहाणे.
४) आरोग्य सहाय्यक (पु)यांच्या मदतीने उपकेंद्रातील आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सभेचे नियमित आयोजन करणे.
५) कार्यक्षेत्रात निरनिराळया आरोग्य सेवांचे आयोजन करण्यामध्ये प्रा.आ.केद्रातील वैद्यकिय अधिकारीयांना सहाय्य करणे

६) आरोग्य संघाचे घटक म्हणून आरोग्य कार्यक्रमांतर्गत जनशिबीर आणि धडक मोहिमेमध्ये सहभाग घेणे.

## ➢ पुरवठा ,साहित्य व उपकेंद्र देखभाल( Material Supply & Maintainance)

१) आरोग्य सहाय्यकाच्या सोबत प्रत्येक उपकेंद्रातील साहित्य पुरवठयाची वेळोवेळी देखभाल करणे आणि साहित्य पुरवठा उपलब्ध करुन देण्यांत मदत करणे
२) उपकेंद्रात औषधी व्यवस्थित ठेवलेल्या आहेत किंवा नाहित याची पडताळणी करणे व इतर साहित्याची देखभाल योग्यरित्या केली जाते किंवा नाहि ते पाहणे.
३) आरोग्य सेवक (म) स्वत:ची किट व प्रसुती किट व्यवस्थित ठेवते किंवा नाहि तेपहाणे व त्याची खात्री करणे.
४) उपकेंद्र स्वच्छ व नीटनेटके आहे याची दक्षता घेणे.
५) प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत औषधी व साहित्याची देखभाल व व्यवस्थापन करणे.

## ➢ नोंदवह्या आणि अहवाल (Register& Report)

१) आरोग्य सेविकांची नोंद वहि तपासणे.व त्यांना अडचण आल्यास मार्गदर्शन करणे.
२) नोंदवहि व्यवस्थित ठेवणे व आवश्यक अहवाल तयार करणे.
३) आरोग्य सेविकांच्या अहवालांचा आढावा घेणे.व अहवाल संकलित करुन प्रा.आ.केंद्राला सादर करणे.

## ➢ प्रशिक्षण (Training)

१) आरोग्य सेविकांच्या मदतीने दाईंचे प्रशिक्षण आयोजित करणे
२) वेगवेगळया आरोग्य कर्मचारी,आरोग्य मार्गदर्शक,दाई यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यांकरीता वैद्यकिय अधिकाऱ्यांस मदत करणे.

## ➢ प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम (RCH)

१) आरोग्य सेविकेच्या मदतीने दर आठवडयाला उपकेंद्र स्तरावर आरोग्य सेवा सत्र आयोजित करणे.
२) आरोग्य सेवक / सेविका, प्रशिक्षित दाई यांना गरज पडेल तेंव्हा मदत करणे.
३) कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा स्विकार न करणारे जोडप्यांना स्वत: जातीने भेटी देवून मत परीवर्तन करणे.
४) जनतेला वैद्यकिय गर्भपाताविषयी उपलब्ध असलेल्या सेवांची माहिती देणे.व गरजूंना योग्य शासनमान्य दवाखान्यांत पाठवणे.
५) कुटुंब नियोजनाच्या प्रचलित साधनांच्या वितरणाकरिता आरोग्य सेविकेला,डेपोहोल्डरला तयार करण्यांकरिता मदत करणे.व त्या डेपोहोल्डरला आरोग्य सेविकेच्या मदतीने प्रशिक्षण देणे.
६) तांबी कार्यक्रम राबविणे.व पाठपुरावा करणे तसेच सहाय्यक प्रसुती प्रसाविका यांचे प्रशिक्षण घेणे.

७) सर्व गर्भवती माता नवजात शिशु व बालकाच्या लसीकरणाची व्यवस्था करणे, व पर्यवेक्षण करणे.

८) शितसाखळी अखंड ठेवणे.

### ➢ पोषण (Nutrition)

१) नवजात बालक व पाच वर्षाखालील बालकांतील कुपोषणाचे रुग्ण शोधणे त्यांना सल्ला व उपचार देणे.गंभीर मुलांना प्रा.आ.केंद्रात रवानगी करणे.

२) अंगणवाडी कार्यकर्तीच्या मदतीने कामाचे पर्यवेक्षण व त्यांना मार्गदर्शन करणे.

३) लाभार्थींना लोह व फॉलिक ॲसिडच्या गोळया व जिवनसत्व अ च्या मात्रा योग्य प्रमाणांत,योग्य कालावधीकरीता मिळतील याची दक्षता घेणे.

४) मातांना स्तनपानाविषयी शिक्षण देणे.

### ➢ वैद्यकिय उपचार (Medical treatment)

१) किरकोळ आजारावर उपचार,अपघात व अकस्मिक बाबींकरिता प्रथमोपचार देणे.आणि गंभीर रुग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्र येथे किंवा जवळच्या दवाखान्यांत रवानगी करणे.

२) आरोग्य कर्मचारी यांनी पाठवलेल्या रुग्णांना सेवा पुरवणे व आवश्यकतेनुसार संदर्भ सेवेकरीता पाठवणे.

### ➢ आरोग्य शिक्षण,संप्रेषण,कौशल्य आणि समुपदेशन (H.E.Communication,Skill&- Counseling)

१) प्रजनन आणि बाल आरोग्य,कुटुंब कल्याण पोषण आणि लसीकरण याबाबत आरोग्य सेविकेच्या सहकार्याने आरोग्य शिक्षण उपकेंद्र राबविणे.

२) समाजातील पुढाऱ्यांसोबत गटसभेचे आयोजन करणे आणि त्यांना आरोग्य कार्यक्रमां विषयीचे संदेश प्रसारित करण्यांमध्ये सहभागी करुन घेणे.

३) आरोग्य सेविकेच्या मदतीने महिला नेत्यांकरीता प्रशिक्षण आयोजित करणे.

४) कुटुंब कल्याण कार्यक्रमांमध्ये महिला मंडळ,शिक्षण आणि समाजातील इतर महिला यांचा सहभाग मिळवून घेणे.

५) कुटुंब नियोजन साधनांचा स्विकार वैद्यकिय गर्भपात,प्रजनन मार्गास जंतुसंसर्ग,लैंगिक आजार आणि एड्स या विषयी आरोग्य सेवक (स्त्री/पु)यांच्या मदतीने समुपदेशन सत्राचे आयोजन करणे.